**नमस्कार,**

राज्यसेवा पूर्व परीक्षा आणि संयुक्त पूर्व परीक्षा यांची तयारी आता शेवटच्या टप्प्यात आली आहे. राज्यसेवा पूर्व परीक्षेसाठी एक महिना आणि संयुक्त पूर्व परीक्षेसाठी दोन महिन्यांचा कालावधी हातात उरलेला आहे. या मर्यादित काळात प्रत्येक दिवसागणिक काटेकोर नियोजन आखून त्याची अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. या शेवटच्या काळात आपण जे करू त्यावर पूर्व परीक्षेचे यशापयश अवलंबून असते.

आता जवळपास संपूर्ण अभ्यास करून झाला आहे. टेस्टसिरीजच्या माध्यमातून आपल्या तयारीचा अंदाजही येत आहे. आपण कुठे चुकतो? कशामुळे चुकतो? हे देखील लक्षात येत आहे. स्वत:च्या मूल्यमापनातून जे सत्य समोर आले आहे ते स्विकारून अभ्यासाच्या पद्धतीत ताबडतोब बदल करणे गरजेचे आहे. सत्य समोर येऊन देखील ते न स्विकारल्यास आपला प्रवास उलट्या दिशेने होण्याचीच शक्यता जास्त आहे.

परीक्षेच्या शेवटच्या टप्प्यात उजळणीवर खूपच भर द्यावा लागतो. पण उजळणीचा नेमका अर्थ समजलेला असायला हवा. उजळणीमधून आपण केलेल्या अभ्यासाकडे पुन्हा नव्या दृष्टिकोनातून पहावे लागते. ज्या बाबी समजलेल्या असतील त्यांचे नवीन पैलू समोर येतात. ज्या समजलेल्या नाहीत त्यासाठी चिकाटीने प्रयत्न करून त्या समजून घ्याव्या लागतात. सरधोपटपणे आधी जे वाचले ते तसेच वाचून उजळणी होत नाही.

राज्यसेवा पूर्व परीक्षा आणि संयुक्त पूर्व परीक्षा या दोन्ही द्यावयाच्या असल्यास आता एक महिना पूर्णपणे राज्यसेवेवर लक्ष केंद्रीत करायला हवे. त्यानंतरच्या एक महिन्यात संयुक्त पूर्व परीक्षेकडे पाहता येईल.

ज्या गोष्टींचे पाठांतर करावे लागते त्या आता ठोसपणे समोर यायल्या हव्यात. प्रत्येक दिवशी कोणते पाठांतर करायचे याचे आठवडाभराचे नियोजन आधीच करायला हवे. एकच बाब दिवसभरात किमान तीन वेळा नजरेखालून जाणे याचा पाठांतरामध्ये समावेश असायला हवा. शेवटच्या महिन्यात पाठांतर करायच्या घटकांची याप्रकारे किमान तीन आवर्तने व्हायला हवीत.

तुमच्या यशाच्या प्रवासामध्ये 'शेर्पा' सदैव तुमच्या सोबत आहे.

आपल्या सुचना व अभिप्राय यांचे सदैव स्वागत आहे.

आपला

**संपादक**

मुख्य संपादक
**विश्वनाथ जयसिंग पाटील**

संपादक
**डॉ.जया विश्वनाथ पाटील**

कार्यकारी संपादक
**श्रीकांत साताप्पा साठे**

उप संपादक
**पराग पुरोहित**
**संदीप राजपूत**
**अभिजित पाटील**

मुखपृष्ठ मांडणी
**रसिका सागवेकर**

मांडणी
**अपूर्वा शिंदे**
**भाग्यश्री घुणकीकर**

मुद्रितशोधन
**प्रज्ञा भोसले**

वितरण व्यवस्था
**८३९०५५४१६१**

अभिप्राय, सूचना व वर्गणी
संपर्क
**'पृथ्वी पब्लिकेशन',**
**१५३६, सदाशिव पेठ, पुणे ३०.**
**फोन.: ०२०-२४४५१९८४/८६**
admin@prithvi.net.in

'यशाची परिक्रमा' हे मासिक मालक, 'पृथ्वी पब्लिकेशन' यांचेकरिता मुद्रक व प्रकाशक विश्वनाथ जयसिंग पाटील यांनी सकाळ मीडिया प्रा.लि.पुणे येथे छापून १५३६, सदाशिव पेठ, पुणे ४११०३० येथे प्रसिद्ध केले.

मार्च २०२०
# यशाची परिक्रमा
MPSC/UPSC परीक्षांसाठी मासिक

PRITHVI academy

## अनुक्रम


**वृत्त परिक्रमा**

केंद्रीय अर्थसंकल्प २०२०-२१ ...५

**चालू घडामोडी**

राजकीय व घटनात्मक ...१०
जागतिक घडामोडी ...१९
महाराष्ट्र ...२७
आर्थिक घडामोडी ...३३
सामाजिक घडामोडी ...४१
पर्यावरण ...४९
विज्ञान व तंत्रज्ञान ...५५
संरक्षण व अंतरिक्ष ...६०
पुरस्कार व पुस्तके ...६७
क्रीडा घडामोडी ...७१
दिनविशेष ...७५

**समग्र**

लोकराज्य ...७६
योजना ...८०

**विशेष परिक्रमा**

भारताची आर्थिक पाहणी २०१९-२० ...८५

**शेर्पा**

स्व-प्रतिमा ...९६

या विषयाचा व्हिडिओ पाहण्यासाठी
पुढील QR कोड स्कॅन करा.

# स्व-प्रतिमा

बालपणापासून आपण स्वत:ची एक ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असतो. ही ओळख आपल्या अस्तित्वाचे प्रतीक मानतो. ओळख निर्माण करणे, ती आणखी मजबूत करणे, तिच्यामध्ये विविधता आणणे यासाठी अनेक परीने आपले प्रयत्न सुरू असतात. आपल्याला हवी तशी ओळख निर्माण होणे याला आपण यश मानतो, तर तशी ओळख निर्माण न झाल्यास त्याची अपयशात गणना करतो.

आपली स्वत:ची ओळख आपण ज्या गोष्टींच्या आधारे ठरवतो, त्या सर्व गोष्टी आपण टप्प्याटप्प्याने प्राप्त केलेल्या असतात. आपण जे प्राप्त केले ती आपली ओळख बनण्यासाठी एका गोष्टीची नितांत आवश्यकता असते. ती गोष्ट म्हणजे, आपण जे प्राप्त केले त्याला मिळणारी मान्यता. जे मिळवले त्याला मान्यता मिळाली नाही, तर ती आपली ओळख बनत नाही. म्हणजेच आपण बरेच काही प्राप्त करायचे आणि त्याला मान्यताही मिळवायची असा दुहेरी प्रवास आपल्याला करावा लागतो. ही मान्यता देखील सर्वमान्य निकषांच्या आधारेच ठरविली जाते.

आपण प्राप्त केलेल्या गोष्टींना मान्यता नेमके कोण देते? खरे तर ही मान्यता आपल्याला इतर लोक देतात. इतरांच्या मान्यतेच्या निकषावर आपण प्राप्त केलेल्या बाबी उतरल्या तरच त्याला इतरांकडून 'आपली ओळख' असा दर्जा दिला जातो. म्हणजेच ती आपली प्रतिमा बनते. इतरांच्या नजरेत आपली जी प्रतिमा निर्माण होते त्यालाच आपण आपली ओळख समजतो. म्हणजेच ही प्रतिमा नेमकी काय आहे हे इतर जण ठरवत राहतात. त्यांना मान्य असलेल्या चौकटीमध्ये आपली प्रतिमा निर्माण करण्याच्या प्रयत्नात आपले आयुष्य आपण कारणी लावतो.

मुळात कोणतीही प्रतिमा कशी निर्माण होते? तुम्ही कसे दिसता हे पाहण्यासाठी तुम्हाला आरशासमोर उभे राहावे लागते. आरशात तुम्ही जसे दिसता तसे आहात असे मानता. विज्ञान असे सांगते की, आरशातील प्रतिमा या भासमान असतात. मग जे भासमान आहे त्याला खरे कसे काय मानायचे? जे भासमान आहे ते सातत्याने बदलत राहते. मग त्याला चौकटीत बांधण्याचा अट्टाहास करण्यामध्ये काय हशील आहे?

आपण आपल्या प्रतिमेच्या प्रेमात असतो. आपली प्रतिमा निर्माण करून ती जतन करण्याचा आटोकाट प्रयत्न करतो. तिला जपण्याचा जिवापाड प्रयत्न सुरू असतो. पण शेवटी ती प्रतिमाच असते आणि तिचे स्वरूप आपण ठरविण्याऐवजी इतर जणच ठरवत राहतात. त्यांच्या मतमतांतरानुसार ते आपली प्रतिमा वेळोवेळी बदलवून आपल्याला दर्शवत राहतात. प्रतिमा कशी हवी हे देखील तेच ठरवितात. आपण त्यानुसार आपली प्रतिमा बदलण्याचा आणि अधोरेखित करण्याचा एक भासमान खेळ सतत खेळत राहतो.

इतरांच्या नजरेत आपली प्रतिमा निर्माण करण्यापेक्षा स्वत:ला स्वत:ची ओळख पटणे जास्त गरजेचे आहे. आरशात दिसते ते केवळ बाह्यरूप आहे. त्यातून खऱ्या असणाऱ्या अंतरंगाचा कधीच ठाव लागत नाही. तो फक्त आपल्या स्वत:लाच ठाऊक असतो. पण आपल्या स्वत:चे मूळ रूप स्वत: शोधल्याशिवाय सापडत नाही. एकदा का ते सापडले की मग प्रतिमेच्या प्रेमात राहण्याची गरजच उरत नाही, कारण आपण प्रतिमेऐवजी स्वत:वरच प्रेम करू लागतो. स्वत:चे मूळ रूप सापडणे हेच मोठे यश आहे!